

४

# ।। काम एष क्रोध एष ।।

**श्री भगवानुवाच**

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव:।**
**महाशनो महापाप्मा विद्धेनमिह वैरिणम्।।३७।।**

**– श्रीमद् गीता – ज्ञानेश्वरी, अध्याय तिसरा**

रजोगुणापासून उत्पन्न होणारा आणि प्रतिबंधामुळे क्रोधात रूपांतर होणारा हा काम कितीही उपभोग मिळाला तरी तृप्त होत नाही. हा महापापी आहे. या लोकी याला वैरी मान.

तर भक्तश्रेष्ठहो, प्रवचनसेवेसाठी आज आपण या श्रीमद्-गीता ज्ञानेश्वरीच्या, तिसऱ्या अध्यायातील ३७ वा श्लोक व त्यावरील माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या २१ ओव्या निवडल्या आहेत. हा श्लोक व ह्या अप्रतिम ओव्या अर्जुनाच्या अगोदरच्या प्रश्नाला श्रीहरींनी दिलेले उत्तर आहे. ३६ व्या श्लोकात पार्थाने विचारले आहे की, 'हे देवा, जिवाला विषयांची इच्छा नसतानाही, कोणाच्या प्रेरणेने जीव बलात्काराने ढकलल्याप्रमाणे पापाचरण करतो?' आणि महाभक्त पार्थाच्या या प्रश्नाला

उत्तर देताना, श्रीहरींनी याचे गूढ अगदी स्पष्टपणे सांगितले की, 'काम एष क्रोध एष' हा काम हा क्रोध! ३७ व्या श्लोकात परमेश्वरांनी जे त्रिकालाबाधित असे, जिवांच्या पतनाचे जे सत्य कारण सांगितले त्यातील गुह्यस्थानांना, जनसामान्यांसाठी स्पष्टपणे उघड करीत माऊलींनी अप्रतिम ज्ञानामृताचा वर्षाव या २१ ओव्यांमध्ये केला आहे.

या श्लोकावर भाष्य करताना पहिल्या ओवीत श्रीहरीबद्दल अतीव आदराने गौरव करताना म्हटले आहे,

**तव हृदयकमळआरामु। जो योगियांचा निष्काम कामु।**
**तो म्हणतसे पुरुषोत्तमु। सांगेन आईक।।२३९।।**

आपल्या हृदयकमळाने जेथे आराम करावा, असे एकमेव ठिकाण जर कोणतं असेल तर ते म्हणजे परमेश्वर श्रीहरी! आपलं हृदय भौतिक सृष्टीतील असंख्य ठिकाणी 'आराम' किंवा सुख घेण्यासाठी धावतं. पण लवकरच त्याचा भ्रमनिरास होतो. प्रत्येक ठिकाणी हे आपलं आरामाचं खरं ठिकाण नाही, हे त्याच्या लक्षात येते. भक्ती आणि सद्गुरूकृपेमुळे त्याच्या अखेर लक्षात येते की, ते आराम करण्याचे खरेखुरे आणि शाश्वत – चिरंतन ठिकाण जर कोणते असेल तर ते श्रीहरी परमात्मा. फक्त तेथेच हृदयकमळास खरेखुरे आणि शाश्वत सुख मिळते.

दुसऱ्या चरणात माऊलींनी, श्रीहरींना योगियांचा 'निष्काम कामु' असे संबोधिले आहे. बघा महाराज, योगी हे नि:ष्काम म्हणजे कामनारहित असतात. म्हणजे त्यांना एका परमेश्वराव्यतिरिक्त कशाचीही प्राप्ती व्हावी, अशी इच्छा नसते. श्रीहरी हीच त्यांची कामनारहीत कामना असते. परमेश्वर प्राप्तीची कामना ही नि:ष्काम कामनाच असते. हीच अतूट कामना त्यांना सच्चिदानंद प्राप्त करून देते. त्यापुढे कोणतीही कामना उत्पन्न होण्याची अजिबात शक्यता नसते. आंतर्बाह्य सच्चिदानंदच कोंदलेला असतो. ज्या श्रीहरीप्राप्तीच्या नि:ष्काम कामनेने योगी त्यांच्या ध्यानात सदैव गढलेले असतात, त्या योग्यांना हमखास श्रीहरी प्राप्ती होते.



तिसऱ्या चरणात माऊलींनी भगवंतांचा उल्लेख पुरुषोत्तम असा केला आहे. संसारग्रामात दोनच पुरुषांचे राज्य असते. क्षर आणि अक्षर असे दोन पुरुष. एक नाशवंत आणि दुसरा अक्षर म्हणजे परमात्म्याचा अंश जो जिवात्मा तो! त्याहून तिसरा जो तो पुरुषोत्तम होय. यासच परमेश्वर असे म्हणतात. जो आदिअंतरहीत म्हणजे त्यास ना जन्म आहे, ना वाढ आहे, ना अंत आहे. जो सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान आहे. त्यासच फक्त पुरुषोत्तम म्हणतात. परमेश्वर श्रीहरींना माऊलींनी 'पुरुषोत्तम' संबोधून यथार्थ गौरविले आहे.

'सांगेन ऐक' हा ओवीचा चौथा चरण होय. आता ते सर्वज्ञ पुरुषोत्तम भगवान श्रीहरी कामक्रोधाचे वर्णन करून पार्थास सांगत आहेत. ज्ञानियांची स्थिती ग्रासून टाकणाऱ्या कामक्रोधाविषयी सांगताना माऊली म्हणतात,

**तरी हे कामक्रोधु पाही। जयांते कृपेची साठवण नाही।**
**हे कृतांताच्या ठायीं। मानिजती।।२४०।।**

तर हे कामक्रोध कसे आहेत ते पाहा. ह्यांचेजवळ दयेचा लवलेश नाही. यांना यमाच्या ठिकाणी मानले जाते.

केवढे महान सत्य सांगितले आहे माऊलींनी येथे. काम म्हणजे कामना. विषयोपभोगाची तीव्रतम इच्छा. तसेच कोणत्याही गोष्टीच्या उपभोगाची लालसा. तारूण्यात येणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषास विषयोपभोगाची अनिवार लालसा सहज उत्पन्न होते, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. धर्माने घालून दिलेल्या नीतीनियमांनी जर ती लवकर पूर्ण झाली नाही, तर ते नियम झुगारून देऊन ती लालसा पूर्ण करण्यापर्यंत कधी कधी मजल जाते. त्यावेळी परिणामांची पर्वा केली जात नाही. आपलं, आपल्या कुटुंबियांचं काय होईल, प्रतिष्ठेचं काय होईल, आपल्या कामनापूर्तीच्या कृतीमळे कदाचित कोणीतरी संबंधित प्राणास देखील मुकेल याचा विचारही केला जात नाही. कारण या कामाच्या ठिकाणी दयेचा लवलेश देखील असत नाही.

एखादे बालक यात्रेतून आपल्या पित्याबरोबर फिरत असते. एखाद्या खेळण्यांच्या दुकानात ते एखादे महागडं खेळणे बघते. तेच खेळणे आपल्यास खेळावयास असण्याची कामना त्याच्या मनात उत्पन्न होते. ते बालक आपल्या पित्यास ते खेळणं खरेदी करण्यास सांगते. ते खेळणं घेण्याची त्या पित्याची ऐपत नसते. पिता मुलास तसे सांगतो. बालक हट्ट धरते. पुढे सरकत नाही. पिता परोपरीने त्यास समजावतो. पण मूल बापाचे ऐकत नाही. तेथून हलायचे मागत नाही. रडायला सुरवात करते. जरा मोठं असेल तर म्हणजे, 'काही मिळायचे नाही तुमच्याकडून!' त्यावेळी त्या बालकाची खेळणं हवं असल्याची इच्छा प्रबळ असते. आपल्या वागण्याने आपल्या पित्यास किती दुःख होईल, याचा विचार त्या बालमनात येणं शक्य नाही. मन जरी बालमन असलं तरी कामना किती प्रबळ व निर्दय असते, याचे प्रत्यंतर या उदाहरणावरून येईल.

कामना मग ती तारुण्यसुलभ विषयोपभोगाची असो किंवा बालमनातील क्षुल्लक वाटणारी असो, ती जर पूर्ण झाली नाही, तिला प्रतिबंध झाला तर तिचे क्रोधात रूपांतर होते. क्रोध अनिवार होत जातो. अनिवार क्रोधाचे रूपांतर सर्वभक्षक राक्षसात होते. त्याच्या ठिकाणी मुळातच दयेस स्थान नसते.

दुसऱ्या अध्यायातील ओवीत माऊली म्हणतात,

**जेथे कामु उपजला। तेथे क्रोधु आधीची आला।**
**क्रोधी असे ठेविला। संमोह जाणे।।३२२।।** – अ. २ रा.

कामना उपजली की तेथे अगोदरच क्रोध उपस्थित झालेला असतो आणि क्रोधात अविचार हा ठेवलेलाच असतो.

सेवेसाठी घेतलेल्या श्लोकावरील ओव्यांपैकी पुढील ओवीत माउली म्हणतात,

**हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ।**
**भजनमार्गीचे मांग। मारक जे।।२४१।।**



हे कामक्रोध ज्ञानरूप धनाच्या ठेव्यावरील मोठे नाग आहेत. विषयांच्या खोऱ्यातील वाघ आहेत. भजनमार्गावरील मारेकरी आहेत की जे सतत मारण्याचे काम करतात.

अशी अख्यायिका आहे की, ज्या ठिकाणी गुप्तधन असते, त्या ठिकाणी मोठाले नाग त्या धनाचे रक्षण करीत असतात. ते धन कोणालाही हस्तगत करू देत नाहीत. त्या प्रकारे क्राम व क्रोध हे ज्ञानरूपी धन ठेव्यावरील मोठाले नाग आहेत. जो ज्ञानाचा ठेवा हस्तगत करण्यासाठी येईल त्याला हे विळखा घालून त्याचे चिपाड करतात.

एखादा भक्त परमेश्वरी ज्ञानाचा ठेवा अधीन करण्यासाठी मोठ्या जिद्दीने वाटचाल करू लागतो. अत्यंत कठोर साधना अंगिकारून अनेक संकटांवर मात करीत ज्ञानठेव्याच्या टप्प्यात पोहचतो. पण त्या ज्ञाननिधीवर बसलेले कामक्रोधरूपी हे महानाग तो ठेवा त्याला हस्तगत करू देत नाहीत. कामरूपी नाग त्याला विळखा घालतो. आपल्या घट्ट विळख्यातून तो त्यास सुटू देत नाही. ज्ञानठेवा हस्तगत होऊ देत नाही. त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या विषयोपभोगांच्या दरीतील हे कामक्रोध वाघ आहेत. माणूस विषयोपभोगाच्या खोल दरीत सहजताच जातो आणि तो त्या दरीतून पुन्हा वर येत नाही. कारण हे वाघ त्यांना चघळून खाऊन टाकतात. मिळालेला नरदेह व्यर्थ जातो. या कामक्रोधांना माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी पुढे भजन मार्गीचे मारेकरी म्हटले आहे. भक्तीच्या मार्गावरील खरे मारेकरी जर कोण असतील तर हे काम व क्रोध होय.

माणूस स्वस्वरूपापासून ढळला तो या कामनांच्या लालसांमुळेच! ज्यावेळी सर्व कामना नष्ट होतील त्याचवेळी त्याला आपले खरे स्वरूप प्राप्त होईल. परमेश्वराची उत्कट भक्ती हाच सर्वश्रेष्ठ मार्ग भक्तास परमेश्वराकडे म्हणजेच स्वस्वरूपाकडे घेऊन जातो. पण हे कामक्रोध त्याच्या मार्गातील मारेकरी होऊन मार्गात उभे असतात. भजनमार्गावरून ते लक्ष विचलित करतात. संत नामदेव महाराज एका अभंगात म्हणतात,

**कीर्तनी बैसता। निद्रे नागविले।**
**मन माझे भुलले। विषयसुखा।।**

तर हे कामक्रोध अशा प्रकारे भजनमार्गावर मारेकरी होत असतात. याच गीता-ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

**विषयविषाचा परिपाडू। गोड परमार्थ लागे कडू।**
**कडू विषय तो गोडू। जिवासी जाहला।।१५९।।**

विषयोपभोगाच्या लालसेची दुष्किर्तीच अशी आहे की, गोड परमार्थ कडू लागतो. म्हणूनच विषयोपभोगाची लालसा ही भक्तीमार्गावरील मारेकरी होय.

**हे देहदुर्गीचे धोंड। इंद्रियग्रामींचे कोंड।**
**यांचे व्यामोहादिक बंड। जगावरी।।२४२।।**

हे कामक्रोध देहरूपी किल्ल्याचे प्रचंड दगड आहेत. इंद्रियरूपी गावाभोवतीचे तट आहेत आणि संपूण जगतामध्ये भ्रम, अविचार इ. उत्पन्न करण्यात हे प्रबळ आहेत.

भक्तहो, या ओवीत माऊलींनी अनुरूप दाखला देऊन जिवाच्या दु:खावर्तात फिरत राहण्याचे कारण सांगितले आहे. हे कामक्रोध देहरूप किल्ल्याचे मोठमोठाले दगड आहेत. ते या देहरूपी किल्ल्याचे रक्षण करीत असतात. ते अतिशय एकसंघ असतात. हे प्रचंड धोंडे जोपर्यंत निखळत नाहीत तोपर्यंत जिवाचे देहरूपास येणे थांबत नाही आणि ते जोपर्यंत थांबत नाही, तोपर्यंत जिवात्मा स्वस्वरूपास प्राप्त होऊ शकत नाही.

दुसऱ्या चरणात माऊली म्हणतात की, हे इंद्रियरूप गावाचे गावकुसू आहेत. पूर्वी गावाचे शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी गावाभोवती तटबंदी असायची. त्यामुळे गावाचे संरक्षण होण्यास मदत व्हायची. तोच गावकुसाचा दाखला माऊली येथे देत आहेत. कामक्रोध हे इंद्रियरूप गावाचे तट आहेत. कोणत्याही कामनेची पूर्ती ही इंद्रियांद्वारे उपभोग घेऊनच होत



असते आणि तेथूनच नवीन कामनेचा उगमही होत असतो. जोपर्यंत कामना नष्ट होत नाही, तोपर्यंत इंद्रिये अबाधित राहतात. वृद्ध होऊन एक देह पडतो. दुसरा साकारतो. अर्थातच इंद्रियांनिशी. मागील देहइंद्रियांशी निगडीत असणारे कामक्रोध पुन्हा दुसऱ्या देहात जसेच्या तसेच संरक्षक असतात. इंद्रियांचे ग्राम सुरक्षित राखतात. याच ओवीच्या पुढच्या चरणात माऊलींनी म्हटले आहे की, यांचे व्यामोहादिक अज्ञानाधिक भ्रांती उत्पन्न करण्यामध्ये जगात प्राबल्य आहे.

जीव हा नेहमी सुखाच्या शोधात असतो आणि कामना ह्या जिवास नेहमी इंद्रियजन्य सुखात गुंतवीत असतात. जे खरे, शाश्वत सुख नसते. तेच खरे आणि शाश्वत सुख असण्याची भ्रांती जर कोण उत्पन्न करीत असेल तर या 'इच्छा'. त्यांची पूर्तता न झाल्यास 'क्रोध' हा ठरलेलाच. यांचे सामर्थ्य इतके मोठे आहे की, सद्विचारास देखील लोळवून, हे कामक्रोध विजयी होतात. खरे सुख हे परमेश्वरप्राप्तीत आहे, हे संत कितीही सांगोत, कामनांची शक्ती इतकी मोठी असते की, ती जिवास भ्रांती पाडतेच. काम हा विविध विषयांचा उपभोग घेण्यातच खरे सुख आहे, हेच जिवास पटवून देण्यात यशस्वी ठरतो. विवेकास देखील मागे सारण्याचे सामर्थ्य 'कामा'मध्ये असते. अशा या कामक्रोधाची उत्पत्ती कोठून झाली ते सांगताना माऊली म्हणतात,

**हे रजोगुण मानसीचे। समूळ आसुरियेचे।**
**धालेपण ययांचे। अविद्या केले।।२४३।।**

हे रजोगुणात्मक मनापासून उत्पन्न झाले असून ते मूळचे आसुरी संपत्तीचे आहेत. त्यांचे पालनपोषण अविद्या करीत असते.

महाराज, जसे की आपणास ज्ञात आहे - सत्त्व, रज व तम या त्रिगुणांचे साम्राज्य त्रिलोकांवर आहे. त्यापैकी रजोगुणापासून काम व क्रोध उत्पन्न झालेले असतात. याच श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायात माऊली या गुणाविषयी म्हणतात,

**हे रज याची कारणे। जीवाते रंजवू जाणे।**
**हे अभिलाखाचे तरूणे। सदाचि गा।।२६०।।** अ. १४ वा.

माऊली पुढे म्हणतात की, हे असुरी संपत्तीचे मूळ आहेत. कामक्रोधामुळे आसुरी संपत्ती पुष्ट होत जाते. ढोंगीपणा, गर्व, मानीपणा, क्रोध, मर्मभेदक भाषण आणि अज्ञान ही काही असुरी संपत्तीची लक्षणे होत आणि कामक्रोधांना सशक्त करण्याचे कार्य माया किंवा अविद्या करीत असते. जोपर्यंत अज्ञान आहे, तोपर्यंत कामक्रोधाचे वर्चस्व राहणारच आणि त्यांचे वर्चस्व आहे, तोपर्यंत ज्ञाननिधी हस्तगत होणे अशक्य आहे. जे खरं आहे, ते खरं नाही व जे खरं नाही, ते खरं आहे, असं सतत वाटत राहणं हीच माया होय. माऊली कामक्रोधांचे विश्लेषण करताना पुढे म्हणतात,

**हे रजाचे कीर जाहले। परि तमासि पढियंते भले।**
**त्याने नीजपद या दिधले। प्रमादमोहो।।२४४।।**

हे कामक्रोध रजोगुणापासून जरी जन्म पावले असले तरी हे तमोगुणांचे फार आवडते आहेत. म्हणून तमोगुणाने आपले स्वत:चे पद–माजुरेपणा आणि अज्ञान यांना दिले.

एखाद्या दुष्कृत्य करणाऱ्या व्यक्तीस दुसरी एखादी दुष्कृत्य करणारी व्यक्ती त्याच्या दुष्कर्म कौशल्यामुळे इतकी आवडते की आपल्या दुष्कृत्य करण्याच्या क्षेत्रातले स्वत:चे सर्व गुप्त कौशल्य त्या दुसऱ्या व्यक्तीस बहाल करते. त्यामुळे ती दुसरी व्यक्ती दुष्कर्मात अधिक सशक्त होते. कमालीच्या शिताफीने ती व्यक्ती दुष्कर्मे करते. त्याचप्रमाणे, रजोगुणापासून उत्पन्न झालेल्या कामक्रोधांना तमोगुण स्वत:ची वैशिष्ट्ये प्रमाद–मोह बहाल करतो. त्यामुळे कामनेत प्रतिबंधामुळे उत्पन्न झालेला क्रोध जे करू नये ते करावयास प्रवृत्त करतो. हा अपराध आहे, याचीदेखील जाणीव राहत नाही. त्यातून जीव स्वत:चे व दुसऱ्याचेही वाटोळे करतो. थोडक्यात, कामक्रोधात प्रमाद व मोह यांचे प्राबल्य असते.



भक्तहो, आपण जाणताच की प्रत्येक महान व्यक्तीच्या अंगी असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कौशल्यामुळे, गुणांमुळे त्या त्या क्षेत्रात त्यांना मोठा मान असतो. पराकोटीची प्रतिष्ठा असते. हे झाले सद्‌गुणी–सत्कृत्ये करणाऱ्या सदाचारी समाजातील थोर व्यक्तीबद्दल.

अगदी त्याचप्रमाणे दुष्कृत्य करणाऱ्यांच्या नगरीत, दुष्कृत्यांच्या प्रबल गुणांनी युक्त असलेल्या दुष्कृत्यांच्या सम्राटांना फार मान असतो. जुगारातील अतिशय तज्ज्ञ व्यक्तीला जुगारांचा बादशाह मानले जाते. कपट द्यूताच्या बादशाहस शकुनी मामा म्हणून, कौरव या असुर कुळातील सभेमध्ये मोठा मान होता. चोर दरोडेखोरीतील अतिशय कुशल अशा व्यक्तीस टोळीचा 'सरदार' म्हणून मुजरा केला जातो. स्मगलरांचेही बॉस असतात, अगदी त्याचप्रमाणे या कामक्रोधरूपी कुप्रसिद्ध सम्राटांना एका नगरीत फार मोठा मान असतो आणि तो कोणत्या नगरीत हे सांगताना या नितांतसुंदर ओवीत माऊली म्हणतात,

**हे मृत्यूच्या नगरी। मानिजती निकियापरी।**
**जे जीविताचे वैरी। म्हणवुनिया।।२४५।।**

मृत्युच्या शहरात महाराज, मान कोणाला असेल? तर जो जास्तीत जास्त मृत्यु घडवून आणील त्यास हे कामक्रोध जीवाचे सर्वश्रेष्ठ वैरी आहेत. जिवाचा घात सहजतेने आणि अचूकतेने करण्याचे त्यांचे कौशल्य विलक्षण आहे. म्हणून यांना मृत्युच्या नगरात अतिशय श्रेष्ठ मानले जाते. हे जिवास मोह पाडून एकाच जन्मात यातना भोगावयास लावीत नाहीत तर अनंत जन्मात त्याचा पाठपुरावा करतात. आपले अस्तित्व सूक्ष्मरूपाने त्यांच्यात ठेवून दरवेळी जिवास मृत्युच्या हवाली करतात. मृत्यु त्याचा घास घेऊन पुन्हा त्यास नवदेहरूपाने जन्मास घालतो. त्याबरोबरच अर्थातच हे कामक्रोधही नव्या जोमाने जन्मतात. कारण या कामक्रोधांची भूक इतकी मोठी असते की तिचे माप करताच येत नाही. म्हणून माऊली पुढील ओवीत म्हणतात,

**जयांसि भुकेलिया आमिषा। हे विश्व न पुरेचि घासा।**
**कुळवाडियांचि या आशा। चाळीत असो।।२४६।।**

या कामक्रोधाच्या भुकेच्या नुसत्या इच्छेला संपूर्ण विश्व एका घासालादेखील पुरत नाही. उपभोगाची इच्छा म्हणजे जे आशा ही त्यांचे नाशकारक व्यवहार चालवीत असते.

एखाद्या गोष्टीची कामना मनात निर्माण झाली रे झाली की तिच्या प्राप्तीच्या आशेने जीव आटापिटा करतो. बरे, ती कामनापूर्ती झाल्यावर तरी जीव तृप्त होते का? तर नाही. त्याला पुन्हा नवी इच्छा होते. पायपिट करणाऱ्या व्यक्तीशेजारून एखादा सायकलवरून गेला की अशी सायकल आपल्यालाही हवी अशी इच्छा निर्माण होते. ती पूर्ण करण्यासाठी त्याची धडपड होते. सायकल मिळताच पुन्हा त्याला स्वयंचलित मोटरसायकलची कामना. ती पूर्ण होताच चारचाकी अधिक आरामदायी. ती मिळताच हवाई वाहनाची, किमान हेलिकॉप्टरची इच्छा. ती या जन्मात तरी पूर्ण होणार नाही, हे लक्षात येताच नशिबाला बोल. थोडक्यात, सर्वविषयी, सर्वठायी सर्वप्रकारच्या कामना ह्या वाढतच जातात. अन्य एका ठिकाणी श्री ज्ञानेश्वर माऊलींनी 'भोगे कामु वाढे' असा उत्कृष्ट उल्लेख केला आहे. एक एक उपभोग घेताना चटक वाढते. अन्य उपभोगाची लालसा निर्माण होते. जसे की मागे सांगितले, जीव हा भ्रांतीमुळे भौतिक सृष्टीत सुख शोधीत असतो, जे इंद्रियजन्य असते. कामनांच्या पूर्तीसाठी अविरत धावत असतो. त्या भ्रांतीची व्याप्ती किती प्रचंड आहे त्याचे सार्थ वर्णन पुढील ओवीत पाहा.

**कौतुके कवळिता मुठी। जिये चौदा भुवने थेकुटी।**
**तिये भ्रांतीही धाकुटी। वाल्हीदुल्ही।।२४७।।**

जिने सहज कौतुकाने मुठी वळल्या असता मावण्याला चौदा भुवनेही कमीच ती भ्रांती यांची आवडती, लाडकी धाकटी बहीण आहे.



दृश्यादृश्य जगतातील राहण्याचे निरनिराळे चौदा लोक म्हणजे चौदा भुवने. सहज मुठी वळल्या तर हे चौदा लोक तिच्या मुठीत लिलया मावतात इतकी प्रचंड व्याप्ती या भ्रांतीची म्हणजे अविद्येची आहे. ती या कामक्रोधांची लाडकी बहीण आहे. तिचे सामर्थ्य केवढे आहे, याचे पुढील ओवीत माऊली ज्ञानेश्वर महाराज वर्णन करतात,

**जे लोकत्रयाचे भातुके। खेळताचि खाय कौतुके।**
**तिच्या दासीपणाचेनि बिके। तृष्णा जिये।।२४८।।**

ही भ्रांती केवळ भातुकली खेळता खेळता सहज तिन्ही लोक खाऊन टाकते. त्या भ्रांतीच्या दासीपणाच्या बळावर ही कामनारूपी तृष्णा जगत असते.

अज्ञानामुळे जीव नको त्या बाह्य गोष्टीत सुख शोधत असतो. शाश्वत सुखप्राप्ती त्यास कधीच होत नाही. जीव हा ज्या भ्रामक सुखाच्या मागे धावतो त्यातून त्याची तृप्ती कधीच होत नाही. तृष्णा अधिकच वाढते. तहान ही भ्रांतीची दासी असते. भ्रांती संपत नाही म्हणून तृष्णाही संपत नाही, तर ती उत्तरोत्तर वाढतच जाते. पुष्टही होते. आता या कामक्रोधांना आणखी कोण आदरणीय मानते, ते पहा,

**हे असो मोहे मानिजे। याते अहंकारे घेपे दीजे।**
**जेणे जग आपुलेनि भोजे। नाचवीत असे।।२४९।।**

हे असो पण यांना मोहाने पूज्य मानले आहे आणि ज्या अहंकाराने साऱ्या जागाला नाचवून सोडले आहे, त्याची ह्यांच्याशी देवघेव आहे.

बघा महाराज, या कामाला मानणाऱ्यांमध्ये मोह हा आहे. कोणत्याही उपभोगाविषयीची कामना निर्माण झाली की, ती मिळवण्याचा अनिवार मोह निर्माण होतो. मग सारासार विचार उत्पन्न होत नाही. मोह हाच विवेकास बांधून टाकतो. याचे उदाहरण म्हणजे खुद्द सीतादेवीचेच देता येईल. कपटी रावणाच्या आदेशानुसार कपटी मारीच सुवर्णमृगाचे रूप

घेतो. मारीच राक्षस सोन्याच्या हरणाच्या मनोहर रूपात आश्रमापासून थोडे दूर परंतु सीतादेवीच्या दृष्टीस पडेल, असे वावरतो. त्याच्या अपेक्षेप्रमाणे तो मायावी कांचनमृग सीतामाईच्या दृष्टीस पडतो. तात्काळ सीतादेवीच्या मनात तो सुवर्णमृग आपणास हवा, अशी कामना निर्माण होते.तो मिळवण्याचा मोह सीतामाईच्या मनात निर्माण होतो. कारण मोह हा कामास पूजनीय मानीत असतो. तो मोह सुवर्णमृग मिळवण्याची भावना प्रबळ करतो. वास्तविक सोन्याचे सजीव हरीण जगात असणे हे अशक्य, हे काहीतरी मोहमयी निराळेच असले पाहिजे, या विवेकास मोह वर येऊच देत नाही. श्रीराम प्रभूंजवळ 'तो कांचनमृग मला हवाच' असा हट्ट सीतादेवी धरते. परमेश्वराचेच अवतार राघव त्या मृगाचा पाठलाग करीत दूर वनात जातात. कपटाने लक्ष्मणास देखील दूर नेले जाते. अशा रीतीने सीतादेवीपासून दोघांना दूर नेण्यास कपटी रावण यशस्वी होतो. सीताहरण होते. पुढे रामायण कसे वळण घेते, हे भक्तहो, आपणास ठाऊक आहेच. भल्याभल्यांचा विवेक नष्ट करणारा असा हा मोह कामनेस पूजनीय मानतो आणि ओळखता येणार नाही, इतका कामाच्या निकट असतो.

अहंकाराची या कामाशी देवघेव असते आणि हा अहंकार साऱ्या जगाला नाचवीत असतो. 'मी आहे', 'मी अमूक आहे', 'मी तमूक आहे' अशी जी सदासर्वकाळ भावना असते तो म्हणजे अहंकार होय. आता याची देवघेव कामाशी कशी असते ते पहा. पूर्वकाळी राजेशाही असायची. शौर्यशाली पराक्रमी राजांना वाटायचे की आपणास सम्राट म्हणून इतर राजांनी मानावे, मांडलिक व्हावे. करभार द्यावा. त्यानुसार एखादा शौर्यशाली राजा दूतांकरवी मांडलिकत्व स्विकारण्यासाठी अन्य राजाकडे निरोप धाडीत असे. काही छोटे राजे रागरंग पाहून मांडलिकत्व स्विकारत. पण काही शक्तीशाली राजे ते फेटाळून लावत. त्यामुळे सम्राट बनन्यास उत्सुक राजाचा 'अहं' दुखावला जात असे. गर्व आणि 'अहं' हे जुळे



भाऊच असतात. आपल्या शौर्याचा गर्व असलेला तो राजा, 'माझ्यासारख्या शक्तीमान राजाचा प्रस्ताव त्याने झुगारला काय?' असा विचार करून तो सर्वशक्तीनिशी त्या प्रस्ताव फेटाळणाऱ्या राजावर तुटून पडतो. स्वत:चे 'अहंत्व' दुखावल्यामुळे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी होणाऱ्या तुंबळ युद्धात मग किती प्राणहानी होईल, हे सांगता येत नसे. राजाची सम्राट बनण्याची कामना इतरांना तसा प्रस्ताव नाकारणाऱ्या राजांमुळे 'अहं' दुखावणे व त्यातून युद्ध असे हे अहंकाराच्या देवघेवीचे कामनेबरोबर व्यवहार पूर्वी चालत असत. सांप्रत लोकशाही राज्यपद्धतीत देखील काही महासत्तांना वाटत आहे की, त्यांचाच विचार सर्वांनी मानला पाहिजे. त्यांच्या ह्या कामनेपायी शितयुद्धे होत आहेत व नंतर प्रगट युद्धाचा धोका. तर अशा प्रकारे अहंकाराची देवघेव कामाशी आणि प्रतिबंधामुळे निर्माण होणाऱ्या क्रोधाशी असते.

या कामक्रोधांचे आणखी प्रताप माऊली पुढील ओवीत सांगतात,

**जेणे सत्याचा भोकसा काढिला। असत्य तृणकुटा भरिला।**
**तो दंभु रूढविला। जगी इही।।२५०।।**

ज्याने सत्याचा कोथळा फाडून त्यात असत्याचा पेंढा भरला त्या दंभाला यांनीच जगामध्ये प्रसिद्धीस आणले आहे.

अभिलाषेची भावना, सत्यास लपवून, ज्यात सुख नाही, त्यात सुख आहे, असे मानण्यास भाग पाडते. कामनेपोटी जीव असंख्य कर्मे उपभोगाप्रित्यर्थ करतो. जन्मजन्मांतरी निरनिराळे देह त्यास त्याच्या कर्मानुसार धारण करणे भाग पडते. सत्य, हे त्याच्या दुसऱ्या दंभरूपी प्रतिकृतीमुळे, जिवास कळू देत नाहीत, ते हे कामक्रोध होय.

एखादा स्वार्थी पुढारी स्वत:चे आणि स्वत:च्या बगल बच्चांचे कोटकल्याण करण्यासाठी कणभर लोकहितकार्याचा देखावा करतो. त्याचा आपण लोकसेवाहितार्थ केवढे प्रचंड कार्य केले, असा गवगवा करतो.

आपल्या तथाकथित कार्यकर्त्यांद्वारे प्रचाराची व्यवस्थाही करतो. सत्तेची खुर्चीही मिळवितो. असत्य इतके बेमालूमपणे तो जनतेच्या मनावर बिंबवण्यात यशस्वी होतो की, 'असा त्यागी जनकल्याणकारी दुसरा नेता नाही' अशीच जनतेची दृढ समजूत होते. त्याचे अणि बगलबच्चांचे राजमहाल हे आपल्याच संपत्तीच्या बेमालूम अपहरणातून उभे आहेत, हे सांगून देखील पुन्हा लोक मान्य करीत नाहीत. प्रसंगी कळले तरी 'तेवढे एवढ्या मोठ्या त्यागात (!) चालायचेच' असा उद्‌गार निघतो. तर ढोंग अथवा दंभ हा खरेपणाशी इतका मिळता जुळता असतो. म्हणून जिवास सद्‌मार्गाचा उपदेश खरा वाटत नाही की जो सत्य असतो आणि प्रापंचिक अभिलाषांचा तो मार्ग की जो सुरवातीस रम्य असतो व पुढे क्लेषकारक असतो, ती आनंदाची दंभरूपी प्रतिमा असते, जी जिवास खरी वाटते. कीर्तन, प्रवचनात वीस पंचवीसांची उपस्थिती तर, चित्रपट-तमाशा आदि कार्यक्रमांना वीस-पंचवीस हजारांची. शिट्ट्या, टाळ्यांसह दाद, पैशाची उधळण! कामना-अभिलाषा-मोह-उपभोग्य-इंद्रियजन्य उपभोगातच खरे सुख हा दंभ अशी साखळीच या कामक्रोधांशी जोडलेली असते.

अध्यात्मिक क्षेत्रात तर सध्या दांभिकांची चलतीच आहे. ज्ञानाचा देखावा करून अज्ञानाचे पाठ पढविणाऱ्या ढोंगी साधूंचे जणू पेवच फुटले आहे. हे त्यागाच्या देखाव्या आडून भोगांचे सोहळे पुरवीत आहेत. खरे अध्यात्मज्ञान सांगणाऱ्या सद्‌गुरूंकडे पाठ फिरवून अशा भोंदूंकडे प्रचंड संख्येने अनुयायी धावत आहेत. अशा भोंदूंची बिंगे काही ठिकाणी फुटली असून त्यांची ढोंगे उघडी पडली आहेत. काहीजण तुरुंगाची हवा खात आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तरीही अनुयायी त्यांचेच समर्थन करीत आहेत.

थोडक्यात, जे सत्य नाही तेच सत्यासारखीच असत्याची प्रतिकृती करून तेच सत्य आहे, असे वाटावयास लावण्याचे काम या कामक्रोधांनी



केले आहे. एवढेच नाही, तर त्यांनी पुढे केवढे दुष्कृत्य केले आहे ते पहा,

**साध्वी शांती नागविली। मग माया मांगी शृंगारिली।**
**तियेकरवी विटाळविली। साधुवृंदे।।२५१।।**

यांनी शांतीरूपी साध्वीला वस्त्रहीन केले. मायारूपी मारेकरणीला वस्त्रालंकारांनी शृंगारिले. त्या मायारूपी हत्यारीणीने आपल्या कामक्रोधरूपी लहरींनी साधुवृंदांना भ्रष्ट करून टाकले.

या कामक्रोधांनी पतिव्रता शांतीला वस्त्रहीन करून तिची विटंबना केली. ज्ञानेश्वर महाराजांनी शांतीला 'साध्वी' म्हटले आहे. ती पतिव्रता असते. कारण ती आत्मस्वरूपाशी एकनिष्ठ राहते. म्हणजेच स्वस्वरूपाशी आत्मस्वरूपाशी एकरूप राहण्यातच जिवास चिरंतन शांती मिळते. परंतु कामना किंवा इच्छा इतकी प्रबळ झाली की स्वस्वरूप किंवा आत्मस्वरूप सोडून जिवास इतरत्र धाव घेणे भाग पडले. इच्छा निर्माण झाल्याबरोबर शांती लुबाडली गेली. कामक्रोधांनी दुसरीला सजविले की तीच खरी म्हणून. तिचेच नाव माया होय. तीच जिवाची मूर्तिमंत मारेकरी असून मूर्तीमंत सुखदायिनी असा आभास निर्माण करते. जिवांना चक्रावून त्यांचा घात करते.

आपल्या स्वस्वरूपाकडे जाण्यासाठी विविध मार्गांनी साधना करणाऱ्या साधूंच्या मनात देखील ही मायारूपी मारेकरीण अनेक कामना निर्माण करून, त्या पूर्तीसाठी त्यांच्या मनात मोह निर्माण करतात. मोहग्रस्त साधक भोगात रूतून आपल्या त्यागमार्गापासून भ्रष्ट होतात. पौराणिक वाङ्‌मयात अशी कित्येक उदाहरणे आपणास सापडतात. इतिहासही त्यास अपवाद नाही आणि सांप्रतकाळात तर रेलचेलच आहे, हे भक्तहो, आपण प्रत्यक्ष पाहतच आहात. जे सद्‌गतीस जाणार होते ते अधोगतीस गेले! हा विलक्षण चमत्कार कामक्रोधांनी सजविलेली मायारूपी मारेकरीणच

फक्त करू शकते. तिचा थांग लागणे जवळ जवळ अशक्य असते. कोणत्या ना कोणत्या रूपात ती सत्याच्या आभासाचे गोंडस रूप धरून जिवास भुलविते आणि त्याचा घात करते. अनेक योनीतून त्यास फिरवते.

परमेश्वरप्राप्तीच्या उद्देशाने दुर्गम योगाभ्यास करणाऱ्या योग्यांनादेखील ही चकवते. माया त्याला ऋद्धी-सिद्धींच्या रूपांनी भेटते. त्या सिद्धींचा मोह जर त्या योग्यांना पडला, तर ते त्यातच खेळत बसतात. मार्गभ्रष्ट होतात. पुण्यक्षय होताच सिद्धी नष्ट होतात. नंतर लाजिरवाणे जीवन त्यांच्या पदरी येते.

रानात तपश्चर्येस बसलेल्या, गृहत्याग केलेल्या तपीजनांना देखील ही माया मागील सांसारिक सुखांचे स्मरण देते व ते उपभोग कामनाभारित होऊन आपला तपोमार्ग सोडून घरी संसारात परत येऊन बायकोपोरात रमून जातात. तर घरीच राहून इंद्रियनिग्रहाने राहणाऱ्यांनासुद्धा ही कामना प्रबळ होऊन उपभोगात रममाण करते.

व्यवहारातील दाखला पाहायचा तर कोणत्याही गोष्टीच्या उपभोगाची कामना मनात उत्पन्न होताच ती मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. यशापयशाची चिंता ही शांती ढळण्यास कारण ठरते. इच्छित गोष्टीची प्राप्ती होऊन तिचा उपभोग घेतला तरी क्षणिक तृप्ती होते. पुन्हा नवी कामना निर्माण होते.

या कामक्रोधांनी पुढे काय केले ते पहा,

**इही विवेकाची त्राय फेडिली। वैराग्याची साल काढिली।**
**जितया मान मोडिली। उपशमाची।।२५२।।**

यांनी विवेकाचे बळ संपवून टाकले. वैराग्याचे चामडे सोलून काढले आणि शमदमांची मान जीवंतपणीच मोडली.

सारासार विचाराचे बळच या कामक्रोधांनी नष्ट केले. सार घेऊन असार टाकण्याऐवजी असार घेऊन सार टाकण्यास या कामक्रोधांनी भाग



पाडले. म्हणूनच आत्मस्वरूपापासून जीव अनंत किलोमीटर दूर फेकला गेला. विवेक किंवा विचारशक्ती हे मानवाला लाभलेले फार मोठे वरदान आहे. परंतु कामना-क्रोध-मोह-अविद्या यांनी त्याचे सामर्थ्य नष्ट केले. आपल्या नित्याच्या जीवनात सुद्धा आपणास याचे प्रत्यंतर येते. चांगली विचारवंत माणसंसुद्धा कशाच्या तरी कामनेपायी अविचाराने वागतात. करू नये ते करतात. वागू नये असे वागतात. कामना-मोह यांनी त्यांची विचारशक्तीच नष्ट केलेली असते. महाभारतातील धर्मराजाचे एक उदाहरण मला येथे आठवते.

शकुनीमामा ज्यावेळी कपटद्यूताचा व्यूह रचतो, त्यावेळी धृतराष्ट्र त्यासाठी पांडवांना आमंत्रित करण्याची आज्ञा महात्मा विदुरास देतो. विदुर प्रखर विचारवंत आणि सद्धर्माचरक श्रीकृष्णभक्त असल्याने कौरवांचा डावपेच त्वरित ओळखतो. पांडवांना आमंत्रित करून धर्मराजांना स्पष्ट सूचना करतो की, कोणत्याही परिस्थितीत धर्मराजाने द्यूत खेळू नये. महात्मा विदुराची पूर्वसचूना, स्वत: विचारवंत असूनदेखील, द्यूताचे आमंत्रण मिळताच धर्मराज विदुराची पूर्वसूचना आणि स्वत:चा विवेक गमावून द्यूत खेळायला बसतो. द्यूत खेळण्याच्या प्रबळ कामनेनेच धर्मराजाच्या विवेकाचे बळ नष्ट केले नाही का? एवढेच नव्हे तर पुढे त्याचा संपूर्ण विवेकच नष्ट करण्यात आला. त्याने पुढे सारसर्वस्व द्यूतात हरविले. इतके की भावांना आणि द्रौपदीला पणावर लावण्याचा आपणास कोणताही नैतिक अधिकार नाही, हा विचार देखील त्यास शिवू शकला नाही. धर्मराजाच्या या विवेकभ्रष्ट कृतीचे पुढे किती दुष्परिणाम झाले, हे आपण जाणताच.

या ओवीच्या दुसऱ्या चरणात माऊलींनी म्हटले आहे की वैराग्याची चामडीदेखील यांनी सोलून काढली आहे. दुर्वास ऋषी हे वैराग्यशील ऋषी होते. परंतु ते कोपिष्ट होते. त्यांच्या मनकामनेविरुद्ध काही घडताच ते क्रोधीत होऊन शाप देत असत. क्रोध हा त्यांचे वैराग्य दाबून वर उसळी घेत असे.

संसार असार आहे आणि आत्मतत्व सार आहे, अशी खात्री पटल्याने कोणी एक साधक साधना करण्यास सुरूवात करतो. आता आपल्या मनात कोणत्याही प्रापंचिक उपभोगाची कामना उत्पन्न होऊ द्यायची नाही, असा निश्चय करतो. तसे आचरण करीत साधना चालू ठेवतो.

आकस्मिक एखादी तरुण स्त्री आपल्या प्रेमाचे जाळे त्याच्यावर फेकते. लगेच ते साधकबुवा कामनेच्या मोहपाशात अडकतात. कामाची धारदार सुरी बुवांच्या वैराग्याची चामडी क्षणार्धात काढते. म्हणजेच वैराग्य नष्ट होते. बुवा देवभजन सोडून तिच्या भजनी लागतात. स्वत:चे पारमार्थिक व लौकिक अशा दोन्ही बाजूंनी नुकसान करून घेतात. अशा रीतीने सद्गतीस चाललेला जीव वैराग्याची साल काढली गेल्यामुळे अधोगतीस जातो.

महर्षि विश्वामित्रांचेही असेच झाले. त्यांचे उग्र तप भंग करण्यासाठी इंद्राने भल्याभल्यांच्या दाढीमिशांना पाणी पाजणाऱ्या मेनकेला पाठविले. मेनकेच्या सौंदर्याने विश्वामित्राच्या मनात कामोपभोगाची लालसा निर्माण झाली. त्याबरोबर त्याचे विवेक, वैराग्य, उपशम म्हणजे इंद्रियनिग्रह हे सारे क्षणात नष्ट झाले. मेनकेच्या उपभोगाच्या कामनेने विश्वामित्राचे तपस्या-आसन उद्ध्वस्त केले. सार सोडून तो असाराच्या उपभोगात रमून गेला. ज्यावेळी कामनेचा जोर ओसरला त्यावेळी विवेकाने उसळी घेतली. आपला तपोभंग झाल्याचे विश्वामित्राच्या लक्षात आले. उग्र तपारंभ करण्यासाठी विश्वामित्र ते स्थळ सोडून निघून गेला. अशा प्रकारे कामक्रोधांपुढे विवेक वैराग्य इंद्रियनिग्रह यांचे काही चालत नाही.

**इही संतोषवन खांडिले। धैर्यदुर्ग पाडिले।**
**आनंदरोप सांडिले। उपडोनिया।।२५३।।**



या कामक्रोधांनी आनंदवन तोडून टाकले. धैर्याचे किल्ले जमीनदोस्त केले आणि आनंदस्वरूप रोपटे उपटून टाकले.

आध्यात्मिक आनंद हाच परमानंद होय. तोच संतोषरूप वन होय पण उपभोग कामनेमुळे मानवास मायाधिन होऊन जीवदशेस यावे लागले. जीव स्वस्वरूप हरवला. तो स्वत:च्या कामनारूपी जाळ्यात फसला. संतोषाचे नंदनवन तो स्वत:च्या वर्तणूकीनेच हरवून बसला. नंदनवन हरवण्याची कथा बायबलमध्येसुद्धा आहे, तीसुद्धा या दृष्टीने उद्बोधक आहे. कामवासनेचा स्पर्शही न झालेले ॲडॉम आणि इव्ह परमानंदाच्या नंदनवनात वावरत असतात. 'ज्ञानाच्या झाडाचे फळ फक्त खायचे नाही.' अशी परमेश्वराची आज्ञा असते. मानवाचे सदैव अकल्याण पाहणाऱ्या सैतानास हे पाहवले नाही. त्याने इव्हच्या मनात ते फळ खाण्याची कामना निर्माण केली. इव्हने ते फळ तोडले. स्वत: खाल्ले आणि ॲडॉमलाही खायला दिले. त्यांना 'जाणीव' झाली. मानवाने परमेश्वराच्या केलेल्या आज्ञाभंगाच्या फलस्वरूप त्यांना नंदनवनातून हाकलून देण्यात आले. त्यामुळे दु:ख आणि जन्ममृत्युच्या फेऱ्यात मानव सापडला. अशी नंदनवनाची कथा या दृष्टीने उद्बोधक आहे. परमात्म स्वरूपापासून प्राप्त होणाऱ्या परमानंदापासून ढळलेला एखादा जीव, पराकोटीच्या प्रयत्नांनी तोच पराकोटीचा निरामय आनंद प्राप्त करण्यासाठी अतुल धैर्याने कार्यरत राहतो. पण कशाची ना कशाची तरी कामना निर्माण होऊन त्याच्या निग्रहाचा दुर्ग तीच कामना पाडून टाकते.

आमच्या एका मित्राने यापुढे अभक्ष्य असे काही खायचे नाही, सतत आध्यात्मिक वाचन-भजन-कीर्तन-नामस्मरण-प्रवचनश्रवण यात मग्न रहायचे. ज्यासाठी प्राण्यांची हिंसा केली जाते. जिभेचे चोचले पुरविले जातात, असे काही खायचे नाही, असा निश्चय केला. निश्चय अतिशय चांगला होता. मोठ्या धैर्याने त्याने हा निश्चय पाळला. तो ज्या उदरनिर्वाहाच्या कामासाठी ज्या प्रकारच्या समाजातून वावरत असे,

त्यात अधूनमधून निषिद्ध खाद्याच्या पार्ट्या झोडल्या जात असायच्या. त्या मित्रासही, तो पूर्वी ते खात असल्याने, खावे असा मोह पडायचा. पण निग्रहाने तो मोह, तो मित्र टाळायचा. वर ते अभक्ष्य खादाड त्याची 'बुवा झालाय! हाऽ हाऽ हाऽ' अशी टिंगल टवाळीही करायचे. एकदा तो किरकोळ आजारी पडला. तेवढीच संधी अचूक साधून त्यांच्यातील एकाने त्यास म्हटले, 'अरे तू ते खायचे सोडले. त्यामुळे तुझी तब्येत बिघडली!' हळूहळू त्या मित्राच्या मनात 'ते' अखाद्य 'खाद्य' पुन्हा खायची कामना उत्पन्न झाली. त्याने अभक्ष्य खायला सुरवात देखील केली. 'खाद्य कामनेने त्याचा धैर्यदुर्ग उद्ध्वस्त करून टाकला. मी त्याला सहज विचारले, 'का रे बाबा, तू हे असे दुष्कृत्य का केले?' त्याने उत्तर दिले, 'ते नसल्यामुळे माझी प्रकृती बिघडते!' त्यावर मी त्यास निक्षून सांगितले, 'प्रकृती आहे, ती बिघडणारच. नाना प्रकारचे आजार तिला स्पर्शणार. त्यावर उपचारासाठी वैद्य आहेत. अमोघ औषधे आहेत. ते करायचे सोडून, तू केलेला अतिशय चांगला निर्धार स्वत:च उद्ध्वस्त केलास. पुन्हा नव्याने निश्चय कर व कट्टरतेने त्याचे पालन कर. त्यातच तुझे पारलौकिक हित आहे.' आणि भक्तहो, त्या मित्रास पश्चात्ताप झाला. त्याने पुन्हा निर्धार केला, जो आजपर्यंत तरी म्हणजे सुमारे २४ वर्षे टिकला आहे. तर सांगायचा मुद्दा हा आहे की, धैर्यदुर्ग पाडण्यात हा कामक्रोध अतिशय तरबेज आहे.

**इही बोधाची रोपे लुंचिली। सुखाची लिपी पुसिली।**
**जिव्हारी आगी सुदली। तापत्रयाची।।२५४।।**

यांनी ज्ञानाची रोपे खुडून टाकली. सुखाचे नावसुद्धा पुसून टाकले आणि प्राणिमात्रांच्या हृदयात त्रिविध तापांची आग उत्पन्न केली.

ज्ञानाच्या आड जर खरे कोण येत असेल तर काम! आणि त्याच्याबरोबर असणारा त्याचा एकनिष्ठ गोतावळा. ज्ञानाचे रोप जरा कुठे



जिवाच्या अंतरंगाच्या प्रांगणात जोम धरू लागले, की ते उपटून टाकण्याचे काम हे कामक्रोधादि त्याचा गोतावळा करीत असतात. ज्ञान हा खऱ्या सुखाकडे म्हणजेच परमात्म्याकडे नेणारा मार्ग असतो. त्या ज्ञानाचे रोपटेच उपडले गेल्यावर सुखाचे नाव आपोआपच पुसले जाणार. ते पुसले गेल्यावर जिवाच्या जिव्हारी उरणार काय? तर त्रिविध ताप! म्हणजे आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैवीक त्रास! कायिक, वाचिक, मानसिक ताप!

बघा महाराज, या श्रीमद्गीता-ज्ञानेश्वरीच्या पारायण सप्ताहांतर्गत येथे श्रीदेवी शेवताई, मळाई, काळम्मा मंदिरामध्ये वाचन-भजन-प्रवचन-कीर्तन आदि ज्ञानयज्ञांच्या भक्तीच्या अनेक अंगांची रेलचेल आहे. परंतु लोकसंख्येच्या तुलनेत फारच थोड्यांचा सहभाग आहे. इथे पारायणास बसलेल्या एका भक्ताने आपल्या इकडे न फिरकणाऱ्या मित्रास काल म्हटले, 'अरे संध्याकाळी फार चांगल्या महाराजांचे प्रवचन आहे. ते ऐकायला ये. तेवढे परमेश्वरी ज्ञान मिळेल.' मित्राचा पूर्वनियोजित बेत असतो की संध्याकाळी टी. व्ही. वर चित्रपट बघायचा. परंतु परमेश्वरापासूनच उत्पन्न झालेला माणूस हा स्वभावत:च भक्तीकडे ओढा असणाराच असल्याने तो मित्र तयार झाला. पण क्षणभरातच त्याचा निर्णय बदलला गेला. 'मंदिरात जाऊन प्रवचनातील ते कंटाळवाणे, गंभीर गाऱ्हाणे ऐकण्यापेक्षा टी. व्ही. वरचा सप्तरंगी चित्रपट बघणे अधिक इंटरेस्टींग!' असा विचार करून तो टी. व्ही. वर चित्रपट बघण्यात गर्क झाला. भजनशील जिवात अंकुरणारे ज्ञानाचे रोपटे अशा रीतीने 'कामना' उपटून टाकते.

तर महाराज, परमेश्वरी ज्ञानाची प्राप्ती जर झाली नाही तर सार काय ते कळत नाही. साराकडे जिवाची धाव राहत नाही. असारातच तो सार शोधतो, जसे फोलकटात दाणे शोधावेत आणि त्रिविध तापांचे आगर जो देह तोच जिवास पुन्हा पुन्हा प्राप्त होऊन तो त्रिविध तापांच्या आगीत होरपळत राहतो.

अशा या कामक्रोधांची उत्पत्ती कधी झाली याबद्दल माऊली ज्ञानेश्वर महाराज सांगतात,

**हे आंगा तव घडले। जीवीचि आथी जडले।**
**परि नातुडति गिवसिले। ब्रह्मादिका।।२५५।।**

हे कामक्रोध शरीराबरोबरच निर्माण झालेले आहेत. ते जिवाबरोबरच जडलेले असतात. या कामक्रोधांचा ब्रह्मादिकांनी जरी आतमध्ये शोध घेतला तरी त्यांनादेखील सापडत नाहीत.

याठिकाणी माऊलींनी ज्ञानाचे परमगुह्य पुन्हा एकदा उघडपणे सांगितले आहे. शरीराबरोबरच हे जन्मास येतात आणि शरीर पडताच पुन्हा जिवाबरोबर जडून राहतात. जिवाबरोबर एकजूट होऊन राहिल्याने जिवास जेव्हा पुन्हा देहप्राप्ती होते, तेव्हा पुन्हा हे शरीराबरोबर घडतात. हे इतके सूक्ष्म व जिवाशी एकरूप असतात की ब्रह्मदेवांना देखील ते शोधूनही सापडत नाहीत. याचे कारण माऊलींनी पुढील ओवीत दिले आहे.

**हे चैतन्याचे शेजारी। वसती ज्ञानाच्या एका हारी।**
**म्हणोनि प्रवर्तले महामारी। सावरती ना।।२५६।।**

हे कामक्रोध जिवात्म्याच्याजवळ असतात. ज्ञानाच्या पंगतीला ते राहत असतात. म्हणून यांच्या लहरी मोठ्या प्रमाणात उसळल्या की कोणालाही सावरता येत नाहीत.

जिवात्म्याच्या जवळच वास करणारे हे कामक्रोध ज्ञानाच्या पंगतीला बसत असतात. जेथून जिवात्म्याला स्वस्वरूपाचे ज्ञान होणार हे त्याच पंगतीला असल्याने तात्काळ ओळखतात. जीव जर चिन्मयस्वरूप झाला तर यांचे अस्तित्व काय उरणार? ते आपल्या सामर्थ्यावर जिवास मोह पाडून भरकटवीतात. जिवाचा सत्यानाश घडवून आणतात. याचे भौतिक उदाहरण म्हणजे सत्ताकामनेच्या मोहापायी, अनेक सम्राटांनी प्रचंड युद्धे



करून अगणित प्राणहानी केली आहे. अण्वस्त्रासारख्या बॉम्बचा वापर जर जगावर सत्ता स्थापित करण्याच्या विस्तारवादी कामनेतून आधुनिक काळात एखाद्या महासत्तेने केला तर जगप्रलय होण्यास कितीसा वेळ लागेल? म्हणून ज्ञानेश्वर माऊलींनी अगदी सार्थपणे म्हटले आहे की हे ज्ञानाच्या पंगतीला आणि जिवात्म्याच्या शेजारी वसलेले कामक्रोध इतके प्रचंड सामर्थ्यशाली असतात की जगप्रलय करण्यास प्रवृत्त झाले तर ते कोणासही आवरता येत नाहीत. एखाद्या जिवास नाशाच्या मार्गावर नेण्याची यांची लिला किती सहज असते, हे सांगताना माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**हे जळेविण बुडविती। आगीविण जाळती।**
**न बोलता कवळिती। प्राणियाते।।२५७।।**

हे कामक्रोध माणसाला पाण्याशिवाय बुडवितात. अग्निशिवाय जाळतात आणि प्राणीमात्रांना न बोलता ग्रासून टाकतात.

जीवाला लाभलेला हा जन्म निरनिराळ्या कामना पुरवण्यात, त्यातून उत्पन्न होणाऱ्या दु:खात पिचण्यात जातो. मी खरा कोण आहे? माझे खरे हित कशात आहे? मला परमेश्वरी ज्ञान कसे मिळेल? पराकोटीची परमेश्वरी भक्ती माझ्याकडून कशी घडेल? मला सच्चिदानंदाची प्राप्ती कशी होईल? अशा प्रकारच्या प्रश्नांच्या उत्तरांचा पाठपुरावा करण्याऐवजी, त्यातच नरदेहाची सार्थकता करण्याऐवजी असार प्रापंचिक क्षणिक सुखांच्या मागे धावण्यातच जन्म जात नाही का? केवळ असाराच्या उपसाभरीत जन्म जाणे म्हणजे व्यर्थ गेला असेच ना? म्हणजेच बुडाला जन्म! पाण्याविना, कामनांनी व्यस्त राखून बुडविले असाच याचा सरळ अर्थ नाही का महाराज? तेच त्रिविध तापाचे शरीर पुन्हा पुन्हा प्राप्त होऊन चिंताग्नीच्या विवंचनेच्या अग्नीत जीव सतत होरपळत नाही का? हे आगीविना जाळणे नाही का? चिंता आणि चिता, या दोन शब्दांमध्ये

फक्त एका अनुस्वाराचा फरक आहे. एक आगीविना जीवंतपणी जाळते आणि दुसरी चैतन्यरहित झाल्यावर म्हणजेच मेल्यावर त्या देहास जाळते. हा काम प्राण्याला पूर्वसूचना न देता अचानक-गनिमी काव्याने ग्रासत असतो. इतकेच नव्हे तर आपण ग्रासलो गेलो आहे, हे देखील जिवांना तो कळून देत नाही.

बघा महाराज, बालकाचा किशोर होतो. किशोराचा तरुण होतो. तरुण होतानाच विषयवासनेची मगरमिठी पडते. 'आता तू लहान आहेस, मोठा झाल्यावर मी तुला जखडीन' असे काही काम त्या तरुण झालेल्यास त्याच्या बालपणी सूचित करीत नाही. काम नकळत आपले काम करीतच राहतो.

**हे शस्त्रेविण साधिती। दोरेवीण बांधिती।**
**ज्ञानियासी तरी वधिती। पैज घेऊनी।।२५८।।**

हे कामक्रोध कोणत्याही शस्त्राशिवाय ठार करतात. दोराशिवाय बांधून टाकतात. ज्ञानीजनांना तर विडा उचलून ठार मारून टाकतात.

पहा भक्तहो, जिवांना वधिण्यासाठी या कामक्रोधांना कोणतेही शस्त्र लागत नाही. कारण का तर हे स्वत:च अत्यंत विनाशकारी शस्त्रे आहेत. जिवात्म्यांना बांधण्यासाठी यांना साध्या, नॉयलॉनच्या अथवा ऑयर्न दोरखंडांची आवश्यकता लागत नाही. हेच असे चिवट दोरखंड आहेत की जिवात्म्यांना जखडून अनंत जन्म-मृत्यु भोगावयास लावण्याचे यांचे अगाध सामर्थ्य आहे. जे सारासार विवेक सांगतात अशा ज्ञान्यांना तर अगदी पैजेने ठार करतात. कारण हे ज्ञानाच्या पंगतीलाच बसलेले असतात. ज्ञानी हे त्यांच्या उलट प्रचार करीत असतात. खरे काय ते जिवात्म्यांना समजावीत असतात. जिवात्मे जर परमात्म स्वरूपात मिळून गेले तर यांचे काहीच खाद्य राहिले नाही. नव्हे त्यांचेच अस्तित्व उरले नाही. यांच्याबरोबर देवघेवीचा व्यवहार असलेला 'अहंकार' हा ज्ञानीजनांना



वधण्याच्या कामी या क्रामक्रोधांना सहाय्यकारी असतो. कसे ते पहा. तेराव्या अध्यायात माऊली म्हणतात,

**नवल अहंकाराची गोठी। विशेषे न लगे अज्ञानापाठी।**
**सज्ञानाचे झोंबे कंठी। नाना संकटी नाचवी।।८२।।** – अ.१३

अज्ञानी जीव हा कामक्रोधांच्या अंकित असल्याने त्यांच्या पाठी हे सहसा लागत नाहीत. ज्ञानी मात्र कामक्रोधांना पायदळी तुडवीत परमात्माप्राप्तीच्या मार्गावर चालत असतो. हे कामक्रोधांच्या अस्तित्वाला घातक असते. म्हणून अगदी नाही म्हणण्यासारखी, अगदी किंचित, अशी जरी संधी या कामक्रोधांना प्राप्त झाली तरी ज्ञान्यांच्या मनात कामोर्मींच्या लहरींचा कल्लोळ हे उठवीत असतात. त्यात तो ज्ञानी ठारच होतो.

'काम एष क्रोध एष'... या श्लोकावर अप्रतिम विश्लेषण करणाऱ्या माऊली ज्ञानेश्वर महाराजांची या संदर्भातील शेवटची ओवी अशी आहे,

**हे चिखलेवीण रोविती। पाशिकेवीण गोविती।**
**हे कवणाजोगे न होती। अतौटेपणे।।२५९।।**

हे कामक्रोध चिखलाशिवाय माणसास रुतवून टाकतात. जाळ्याशिवाय अडकवितात. हे शरीरात अतिशय सूक्ष्म रुपाने राहत असल्याने हे सर्वसाधारणपणे कोणाच्याही अधीन होत नाहीत.

केवळ कामनाधीन होऊन विषयोपभोगात गढून गेलेल्या कोणत्याही माणसाचे उदाहरण येथे पुरेसे आहे. मदिरेची चटक लागलेला माणूस चिखलाविणा, व्यसनाच्या चिखलात रुततच जातो. जुगाराच्या नादी लागलेला माणूस जुगाराच्या पाशात जाळ्याविनाच अडकलेला असतो. तर विषयासक्त होऊन स्त्री अधीन झालेला एखादा पुरुष जाळ्याशिवाय जखडूनच असतो. येथे त्यास गोविण्यासाठी निराळे जाळे लावण्याची गरज नसते.

हे देहाच्या आत अतिशय सूक्ष्म रूपाने चैतन्याच्या शेजारी ज्ञानाच्या पंगतीलाच असल्याने त्यांच्यावर कोणीही वर्चस्व गाजवू शकत नाही.

काम-क्रोध-मोह-मत्सर, मद, लोभ आदि जे षड्रिपू आहेत, ते एकट्या कामापासूनच उत्पन्न होतात, असे येथे परमेश्वरांनी स्पष्ट दर्शवले.

रजोगुणापासून उत्पन्न होऊन, प्रतिबंधामुळे क्रोधात रुपांतरित होणारा हा काम! कितीही उपभोग मिळाला तरी याची तृप्ती होत नाही. हा महापापी आहे. यालोकी याला तू वैरी मान, या अर्थाच्या ३७ व्या श्लोकांवरील माऊलींनी केलेल्या २१ ओव्यांतील विश्लेषणावरील, विवेचन आत्तापर्यंत आपण ऐकलेत. आता प्रश्न असा उरतो की, यावर मात करण्याचा उपाय कोणता? तो तिसऱ्या अध्यायाच्या २६८ व्या ओवीत माऊलींनी सांगितला आहे.

**यांचा पहिला कुरूठा इंद्रिये। एथुनी प्रवृत्ती कर्माते विये।**
**आधी निर्दळुनि घाली तिये। सर्वथैव।।२६८।।**

या कामक्रोधांचे वास्तव्य इंद्रियांच्या ठिकाणी असते. त्यांच्यापासूनच कर्माची प्रवृत्ती होते. म्हणून त्या इंद्रियांना प्रथम जिंक.

आणि महाराज, या कामक्रोधांच्या विनाशक शक्तीचे उन्नीयन परमेश्वर भक्तीत करून इंद्रियांना जिंकण्याचा एक प्रभावी उपाय आहे. इंद्रियांना स्वैर राहू न देता त्यांचे नियमन करून मनास सर्वभावांनी परमेश्वर भक्तीत तल्लीन करणे आवश्यक आहे. भक्तीच्या उत्कट प्रभावाने स्वत: परमेश्वरच आपणास, या जिवात्म्यांच्या सर्वांत मोठ्या शत्रूंना-कामक्रोधांना जिंकण्यास सहाय्य करील, हे नि:संशय! प्रारंभी या इंद्रियांवर विजय मिळविल्यावर कामक्रोध या पाप्यांचा आश्रय नष्ट होईल, हे सांगताना माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**मग मनाची धाव पारूषेल। आणि बुद्धीची सोडवण होईल।**
**इतुकेनी थारा मोडेल। या पापियांचा।।२६९।।**



आपण माझे बोबडे बोल शांतपणे ऐकलेत, त्याबद्दल धन्यवाद! बोलतांना झालेल्या चुकांबद्दल आपण उदार मनाने क्षमा करावी, ही नम्र विनंती.

पुंडलिका वरदे हरी विठ्ठल
श्री ज्ञानदेव तुकाराम श्री गुरुदेव दत्त।।
।। ॐतत सत्।। ॐ तत् सत्।। ॐ तत् सत्।।

(मणदूर, ता शिराळा, जि. सांगली, येथे श्रीमद्गीता ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहांतर्गत श्रीदेवी शेवताई, मळाई, काळम्मा मंदिरात सोमवार दिनांक २८ फेब्रुवारी २००० रोजी दिलेले प्रवचन.)

❍❍❍